EAU/ICD/2019-20/505
08/01/2020
(9)

मसुदा
क्र./२०२०–२१

मुंबई विद्यापीठ

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०१९–२० मधील ३ जानेवारी, २०२० च्या बैठकीचे इतिवृत्त.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०१९–२० मधील नववी बैठक शुक्रवार दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी सकाळी ९.३० वाजता व्यवस्थापन परिषदेचे दालन, फोर्ट परीसर, मुंबई–३२ येथे आयोजित करण्यात आली. बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :–

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य |
| ३. | डॉ. राजेश खरात | सदस्य |
| ४. | डॉ. (श्रीमती) रश्मी ओझा | सदस्या |
| ५. | प्राचार्य(डॉ.)अजय भामरे | सदस्य |
| ६. | प्राचार्य(डॉ.)महादाप्पा गोंडा | सदस्य |
| ७. | प्रा. वैभव नरवडे | सदस्य |
| ८. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| ९. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| १०. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| ११. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १२. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १३. | प्रा.बी. एन. जगताप | सदस्य |
| १४. | श्रीमती माधवी इंगोले (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |
| १५. | डॉ. विनोद पाटील<br>(संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ) | निमंत्रित |
| १६. | डॉ. अजय देशमुख, कुलसचिव | सदस्य सचिव |

➢ स्वागत

कुलसचिव तथा सदस्य सचिवांनी माननीय अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे बैठकीत स्वागत करून माननीय अध्यक्षांना सभेचे कामकाज सुरू करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. कुलगुरु, मा. प्र. कुलगुरु व कुलसचिवांनी सभासदांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

➢ अभिनंदन

१. श्री. राजन कोळंबेकर यांनी महाराष्ट्र राज्याचे मा. उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वामध्ये जे मंत्रिमंडळ स्थापन झाले आहे त्या मंत्रीमंडळाच्या अभिनंदनाचा ठराव मांडला त्याला श्री. प्रदिप सावंत यांनी अनुमोदन दिले.

२. श्री. प्रदिप सावंत यांनी सोलापूर विद्यापीठ येथे आयोजित आंतरविद्यापीठ क्रिडामहोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाच्या चमुने विजेतेपद पटकावले त्याबददल अभिनंदनाचा ठराव मांडला त्याला प्रा. रविकांत सांगुर्डे यांनी अनुमोदन दिले.

३. प्राचार्य. अजय भामरे यांनी वेस्ट झोन 'कल्चरल फेस्ट' झाली त्यामध्ये आपल्या विद्यापीठाच्या चमुने उपविजेतेपद पटकावले आहे यासंदर्भात अभिनंदनाचा ठराव मांडला व अॅड. नील हेळेकर यांनी अनुमोदन दिले.

वरील सर्वांचे अभिनंदन करण्यात आले.

➢ श्रध्दांजली

**श्री:श्रीराम लागू**

रंगभुमीवरील नाटयवादळ ज्येष्ठ अभिनेते डॉ श्रीराम लागु यांचे वृध्दापकाळाने दिनांक १७ डिसेंबर, २०१९ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षाचे होते.

**श्री. जयशंकर शंकर आपटे**

ज्येष्ठ लेखक श्री. जयशंकर शंकर आपटे यांचे वृध्दापकाळाने दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षाचे होते.

वरील मान्यवरांच्या दुखद निधनाबद्दल शोक व्यक्त करुन २ मिनिटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

| | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र.१ | दि. १३ सप्टेंबर, २०१९, १८ सप्टेंबर, २०१९ (१३ सप्टेंबर, २०१९ रोजीची स्थगीत सभा) व २३ ऑक्टोबर, २०१९व १३ डिसेंबर,२०१९ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव<br>१) | **व्यवस्थापन परिषद दि. १३ सप्टेंबर, २०१९**<br><br>बाब क्र. ४— वित्त व लेखा समितीच्या दि. १७ जून, २०१९ रोजीच्या सभेत केलेल्या शिफारसी व्यवस्थापन परिषदेस सादर<br><br>वित्त व लेखा समितीच्या दि. १७ जून, २०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त खालील सुचनांसह मंजुर करण्यात आले.<br><br>i) बाब क्र. २ बाबत दि. १६.९.२०१९ च्या वित्त व लेखा समितीमध्ये पुनर्विचार करण्यात यावा. बाब क्र. २ च्या वित्त व लेखा समितीच्या निर्णयावर श्री. रविकांत सांगुर्डे यांनी आक्षेप नोंदविला.<br><br>ii) बाब क्र. १४ वरील चर्चेच्या अनुषंगाने महाविदयालयांना आंतरराष्ट्रिय परिसंवादासाठी वित्तिय सहाय्य दयावयाचे असल्यास सर्व महाविद्यालयांसाठी परिपत्रक काढावे जेणेकरुन सर्व महाविदयालयांना लाभ घेता येईल.<br><br>**च्या ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे**<br><br>बाब क्र. ४— वित्त व लेखा समितीच्या दि. १७ जून, २०१९ रोजीच्या सभेत केलेल्या शिफारसी व्यवस्थापन परिषदेस सादर.<br><br>वित्त व लेखा समितीच्या दि. १७ जून, २०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त खालील सुचनांसह मंजुर करण्यात आले.<br><br>i) बाब क्र. २ बाबत दि. १६.९.२०१९ च्या वित्त व लेखा समितीमध्ये पुनर्विचार करण्यात यावा. बाब क्र. २ च्या वित्त व लेखा समितीच्या निर्णयावर श्री. रविकांत सांगुर्डे यांनी आक्षेप नोंदविला.<br><br>ii)बाब क्र. १४ वरील चर्चेच्या अनुषंगाने **प्रा. वैभव नरवडे यांच्या सुचनेनुसार** महाविदयालयांना आंतरराष्ट्रिय परिसंवादासाठी वित्तिय सहाय्य दयावयाचे असल्यास सर्व महाविद्यालयांसाठी परिपत्रक काढावे जेणेकरुन सर्व महाविदयालयांना लाभ घेता येईल. | वित्त व लेखा व वि.नि.वि.वि. |



SKS

ठराव २) पान क्र. १ मध्ये स्वागत नंतर खालील परिच्छदेचा समावेश करण्यात यावा.

"श्री. दिपक मुकादम आणि प्रा. बी.एन. जगताप यांनी त्यांची अनुपस्थिती कळविलयाने त्यांची अनुपस्थिती मंजुर करण्यात आली."

चर्चेच्या अनुषंगाने

३) मुद्दा क्र. ४. –मुंबई विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांनी सामाजिक, राजकीय आर्थिक व इतर सर्वच क्षेत्रात महत्वाचे योगदान दिले असल्याने त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्यामुळे मुंबई विद्यापीठातून शिक्षण घेऊन भारतासह जगभरात नावलौकिक कमविणा–या माजी विद्यार्थ्याच्या कर्तृत्वाची ओळख पटवून देण्यासाठी आणि त्यांचा यथोचित गौरव होण्याकरीता व त्यांच्या उत्कृष्ठ कामगीरीची दखल घेण्यासाठी दरवर्षी ३ माजी विद्यार्थ्यांना (वय वर्ष किमान ५० पूर्ण) सन २०१९–२० पासून विद्यापीठाकडुन 'डायमंड ऑफ युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई' हा पुरस्कार देउन माजी विद्यार्थ्यांना गौरविण्यात यावे, असे ठरले. विद्यापीठातर्फे घेण्यात येणा–या विशेष कार्यक्रमात सदर विद्यार्थ्यांना राजाबाई टॉवरचे स्मृतिचिन्ह व मानपत्र देउन गौरविण्यात यावे. सदर कार्यक्रमात सदर पुरस्कारकर्त्याचे विचारपुष्प व्याख्यानमाला ठेवण्यात यावी. विद्यापीठाच्या सन २०२०–२१ च्या अर्थसंकल्पामध्ये सदर पुरस्कारासाठी तरतूद करण्यात यावी. यावर्षीचा खर्च सर्वसाधारण निधिमधून करण्यात यावा. APD.

पुरस्कार निश्चित करण्याकरता समिती गठीत करण्यात यावी. समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना प्रदान करण्यात आले.

१. प्रो. शशीताई वंजारी, कुलगुरु, एस.एन.डी.टी.विद्यापीठ अध्यक्ष
२. संजय देशमुख, आय.आय.टी.दिल्ली
३. प्रो. ए. बी. पंडित, आय.सी.टी.

च्या ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे

चर्चेच्या अनुषंगाने

मुद्दा क्र. ४.– मुंबई विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांनी सामाजिक, राजकीय आर्थिक व इतर सर्वच क्षेत्रात महत्वाचे योगदान दिले असल्याने त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्यामुळे मुंबई विद्यापीठातून शिक्षण घेऊन भारतासह जगभरात नावलौकिक कमविणा–या माजी विद्यार्थ्याच्या कर्तृत्वाची ओळख पटवून देण्यासाठी आणि त्यांचा यथोचित गौरव होण्याकरीता व त्यांच्या उत्कृष्ठ कामगीरीची दखल घेण्यासाठी दरवर्षी ३ माजी विद्यार्थ्यांना (वय वर्ष किमान ५० पूर्ण) सन २०१९–२० पासून विद्यापीठाकडुन 'डायमंड ऑफ युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई' हा पुरस्कार देउन माजी विद्यार्थ्यांना गौरविण्यात यावे, असे ठरले. विद्यापीठातर्फे घेण्यात येणा–या विशेष कार्यक्रमात सदर विद्यार्थ्यांना राजाबाई टॉवरचे स्मृतिचिन्ह व मानपत्र देउन गौरविण्यात यावे. सदर कार्यक्रमात सदर पुरस्कारकर्त्याचे विचारपुष्प व्याख्यानमाला ठेवण्यात यावी. विद्यापीठाच्या सन २०२०–२१ च्या अर्थसंकल्पामध्ये सदर पुरस्कारासाठी तरतूद करण्यात यावी.यावर्षीचा खर्च सर्वसाधारण निधिमधून करण्यात यावा.

पुरस्कार निश्चित करण्याकरता समिती गठीत करण्यात आली होती. तथापी संपूर्ण समितीने कार्य करण्यास असमर्थता दर्शविल्याने नविन समिती गठीत करण्यात आली.

१. पंडित विद्यासागर राव, माजी कुलगुरू,नांदेड–अध्यक्ष
२. प्रो. सुनिल भागवत, आय.सी.टी.
३. प्रो.एस.डी. सांमत, आय.सी.टी.

| | | |
|---|---|---|
| ४) | ४. श्री. राजीव चूरी<br>५. प्रा. एम. व्ही. कुलकर्णी, पुणे विद्यापीठ<br><br>**व्यवस्थापन परिषद २३ ऑक्टोबर, २०१९**<br><br>**बाब क्र. १२—अस्थायी माळी कर्मचाऱ्यांना पावसाळी सामुग्री (रेनकोट, गमबुट व इतर) देण्याबाबत.**<br><br>अस्थायी माळी कर्मचाऱ्यांना पावसाळी सामुग्री (रेनकोट, गमबुट व इतर) देण्याबाबत विद्यानगरी येथील अस्थायी माळी कर्मचा—यांना तीन वर्षातुन एकदा सन १ एप्रिल, २०१९ ते ३० मार्च, २०२३ या कालावधीसाठी गमबुट तसेच फोर्ट, विद्यानगरी व विद्यापीठ क्रिडा संकुल येथील अस्थायी माळी कर्मचा—यांना सन १ एप्रिल, २०१९ ते ३० मार्च, २०२३ या कालावधीसाठी २ वर्षातून एकदा रेनकोट देण्यास मंजुरी देण्यात आली. त्या अनुषंगाने अर्थसंकल्पात तरतुद करण्यात यावी.<br><br>**च्या ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे**<br><br>**बाबक्र.१२—अस्थायी माळी कर्मचाऱ्यांना पावसाळी सामुग्री (रेनकोट, गमबुट व इतर) देण्याबाबत.**<br><br>विद्यानगरी येथील अस्थायी माळी कर्मचा—यांना तीन वर्षातुन एकदा सन १ एप्रिल, २०२० ते ३० मार्च, २०२३ या कालावधीसाठी गमबुट तसेच फोर्ट, विद्यानगरी व विद्यापीठ क्रिडा संकुल येथील अस्थायी माळी कर्मचाऱ्यांना सन १ एप्रिल, २०२० ते ३० मार्च, २०२२ या कालावधीसाठी २ वर्षातून एकदा रेनकोट देण्यास मंजुरी देण्यात आली. त्या अनुषंगाने अर्थसंकल्पात तरतुद करण्यात यावी. | स्था.प्र.वि. |
| बाब क्र.२ | **दि. १ जून, २०१९, ४ जुलै, २०१९ व १४ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावावरिल कार्यवाही अहवाल.** | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दि. १ जुन, २०१९, ४ जुलै, २०१९ व १४ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परीषेदेच्या ठरावावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र.३ | मुंबई विद्यापीठातील बंद/वापरात नसलेल्या / जुन्या स्थितीतील वाहनांची विक्री करण्याबाबत समितीने सादर केलेला तात्पुरता अहवाल(**Interim Report)** सादर करण्याबाबत. | सामान्य प्रशासन विभाग |
| ठराव | प्राचार्य(डॉ.) अजय भामरे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीचा अंतरिम अहवालानुसार मा.कुलगुरु (MH-01-BK-1857) व प्र.कुलगुरु (MH-01-BF-6291) यांच्या जुन्या गाडया प्रचलित दरानुसार विकण्याची मान्यता देण्यात आली व सदर गाडया खरेदी करण्यासाठी विद्यापीठातील कर्मचा–यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. उर्वरित गाडयांची सदर समितीने तांत्रिक तज्ञाकरवी पाहणी करावी व सविस्तर तपशिलवार अहवाल व्यवस्थापन परीषदेस सादर करण्यात यावा. | |
| बाब क्र.४ | **Report of the Committee for Vice-Chancellor fellows.** | आस्थापना विभाग १व ३ |
| ठराव | डॉ रविकांत सांगुर्डे, श्री. प्रदीप सावंत व श्री. राजन कोळंबेकर यांनी या प्रस्तावास विरोध दर्शविला सदर बाब मागे घेण्यात आली. प्र.कुलगुरु यांनी सदर अहवालाचा व्यवस्थित अभ्यास करुन व्हीसी फेलोंची संख्या तसेच कोणत्या विभागात त्यांची नियुक्ती करावयाची आहे याची माहिती देण्यात यावी असे ठरले.<br>डॉ. रविकांत सांगुर्डे यांनी विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजाकरीता शिक्षकांची व विद्यार्थ्यांची सेवा उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली व कुलगुरुंच्या सूचनेनुसार पुढील ८ दिवसांत २ आयटी तज्ज्ञ उपलब्ध करुन देतील जे ऑनलाईन इतिवृत्त बनविण्यास मदत करतील. | |
| बाब क्र.५ | एन.एल. दालमिया इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲन्ड रिसर्च या महाविद्यालयाने Master of Management Studies (MMS) Degree परीक्षेत **प्रथम येणा–या विद्यार्थ्यास/विद्यार्थीनीस “श्री निरंजन दालमिया गोल्ड मेडल फॉर एक्सलन्स इन मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज” यांच्या नावे सुवर्ण पदक देण्याबाबत सादर केलेला प्रस्ताव.** | शिष्यवृत्ती विभाग |
| ठराव | Master of Management Studies (MMS) Degree परीक्षेत प्रथम येणा–या विद्यार्थ्यास/विद्यार्थीनीस “श्री निरंजन दालमिया गोल्ड मेडल फॉर एक्सलन्स इन मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज” यांच्या नावे सुवर्ण पदक देण्याकरीता देणगीदार एन.एल. दालमिया इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲन्ड रिसर्च या महाविद्यालयाकडून प्राप्त झालेली देणगी रु. ५ लाख (पाच लाख रुपये फक्त) स्वीकारण्यास व सुवर्णपदक देण्यास मान्याता देण्यात आली. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र.६ | विविध शैक्षणिक संस्था/विद्यापीठ यांसकडून प्राप्त झालेल्या विविध शैक्षणिक कार्यक्रमाकरिता प्राप्त झालेल्या सामंजस्य करारांचा मसुदा मान्यतेस्तव. | विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग |
| ठराव | विविध शैक्षणिक कार्यक्रमाकरिता प्राप्त झालेल्या खालील सामंजस्य करारास मान्यता देण्यात आली :—<br>१. Memorandum of Understanding between Department of Sanskrit, University of Mumbai AND Drishti Stree Adhayan Prabodhan Kendra, Kaushik Asharam, 98, Mitramandal Colony, Parvati, Pune - 411 009 for Development of Discourse on Women in Indian Perspective.<br>२. Memorandum of Understanding between the University of Mumbai AND CASI Offer Credit Based Value add certification programs for students of all streams across all affiliated colleges, institutes and departments under Mumbai University. | |
| बाब क्र.७ | व्यवस्थापन परिषद दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीची स्थगित सभा दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ रोजीची बाब क्र.४० लॉर्डस युनिव्हर्सल विधी महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांच्या तक्रारीबाबत. | महिती अधिकार व विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष |
| ठराव | लॉर्डस युनिव्हर्सल विधी महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांकडुन आकारण्यात आलेले वाढीव शुल्क विद्यार्थ्यांना परत देण्यात यावेत तसेच याबाबत व विद्यार्थ्यांच्या गैरसोईबद्दल मॉनिटरींग समिती गठीत करण्यात यावी. सदर समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना प्रदान करण्यात आले. | |
| समिती | १. प्रा. रश्मी ओझा – अध्यक्ष<br>२. महादेव जमलाने – सदस्य<br>३. प्राचार्य [illegible] पाटील – सदस्य<br>४.<br>५. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र.८ | महाराष्ट्र शासन राजपत्र (असाधारण भाग चार—ब) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील सन २०१९ चे एकरूप परिनियम क्र.१ ची नोंद घेणे व त्यातील ३.शास्ती, अध्यापक आणि कर्मचारी तक्रार निवारण समितीच्या **Non-Compliance**बाबत संलग्न महाविद्यालयावर किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेवर किंवा यथस्थिती, त्याच्या व्यवस्थापनावर शर्तींच्या भंगाच्या कृत्याच्या गांभीर्यानुसार शास्ती लावण्यासाठी मान्यता मिळण्याबाबत. | तक्रार निवाण कक्ष |
| ठराव | महाराष्ट्र शासन राजपत्र (असाधारण भाग चार—ब) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील सन २०१९ चे एकरूप परिनियम महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (कसुरदार संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यावर लादावयाची शास्ती ) एकरूप परिनियम क्र. १ ची नोंद घेण्यात आली. विद्यापीठाच्या आदेशाचे पालन न करणा—या कसुरदार संलग्न महाविद्यालय / मान्यताप्राप्त परीसंस्था यांच्यावर झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने नेमकी कोणत्या तक्रारीस कोणती शास्ती असावी यांची नियमावली बनवण्याकरता समिती गठीत करण्यात यावी. सदर समिती गठीत करण्याचे अधिकार मा.कुलगुरुंना प्रदान करण्यात आले. | |
| समिती | १. प्राचार्य अजय भामरे<br>२. प्राचार्य मुरलीधर कुऱ्हाडे<br>३. कुलसचिव<br>४. | |
| | आयत्या वेळी आलेली बाब | |
| बाब क्र. ९. | Norms and Process of Diamond Jubilee Award | विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांना 'डायमंड ऑफ युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई' हा पुरस्कार देण्याकरीताचा मापदंड ठरविण्याकरीता प्रा. पंडित विद्यासागर राव, माजी कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा युनिव्हर्सिटी, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीचा अहवाल मान्य करण्यात आला; परंतु अहवालातील मुद्दा क्र. ४ मध्ये सुचवलेल्या ४ स्वतंत्र छाननी समितीच्या ऐवजी १ समिती गठीत करण्यात यावी. ज्यात ४. श्रेणींच्या अहवालातील सत्कारमुर्ती ठरविण्याच्या पध्दतीतील मुद्दा क्र.१ मधील ४ श्रेणींचा समावेश करण्यात यावा. सदर समिती गठीत करण्याचे अधिकार मा.कुलगुरुंना प्रदान करण्यात आले. | |

SKS

| | | |
|---|---|---|
| समिति | १. प्रा. स्नेहलता देशमुख - Ex Vice-Chancellor<br>२. प्रा. J. B. Joshi - Ex Director, ICT<br>३. डॉ. अविनाश सुपे - Ex Dean - KEM<br>४. | |
| | कार्यवाही अहवालावरील चर्चेच्या अनुषंगाने खालील ठराव पारीत करण्यात आले. | |
| १. | संलग्नता विभागाद्वारे महाविद्यालयांना देण्यात येणारे नो डयूज सर्टिफिकेटचा मसुदा विधि सल्लागाराकडुन तपासून घेण्यात यावा. | संलग्नता विभाग |
| २. | व्यवस्थापन परीषदेची बैठक झाल्यानंतर इतिवृत्ताचा मसुदा साधारणतः १० दिवसात व्यवस्थापन परीषदेतील सदस्यांना प्रसारीत करण्यात यावा व त्यांच्या सूचना तसेच आक्षेप २ दिवसात मागवण्यात यावेत. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ३. | व्यवस्थापन परीषदेचे कामकाज इ–प्रणालीने करण्याकरता संगणक प्रणाली बनवण्यात आली त्याच्या वापराकरता थिन क्लायंट मागविण्याकरता इ–निविदा प्राप्त न झाल्याने जेम अंतर्गत निविदा मागवण्यात आल्या; परंतु त्यालाही प्रतिसाद मिळाला नाही. श्री प्रदीप सावंत व इतर सदस्यांनी थिन क्लायंट ऐवजी टॅब देण्यात यावे असे सूचविले. याबाबत डॉ. बी.एन. जगताप (अध्यक्ष), प्रा.वैभव नरवडे, वित्त व लेखा अधिकारी व प्रा. श्रीवरमंगाई (सचिव), यांची समिती गठीत करण्यात यावी व त्या समितीने थिन क्लायंट की टॅब याबाबत विचार करावा व स्पॉट कोटेशन मागवून खरेदी करण्यात यावे असे ठरले. | यु.सी.सी. |
| ४. | महाविद्यालयांचे प्रलंबित संलग्नता शुल्काबाबत कुलसचिवांनी उच्चस्तरीय समितीची बैठक तातडीने लावावी. संलग्नता शुल्क महाविद्यालयकडून कसे वसूल करावे याबाबत कुलसचिव, वित्त व लेखा अधिकारी, उपकुलसचिव, संलग्नता विभाग व उच्च स्तरीय समिती यांनी एकत्रित बसून त्यांचा अहवाल तयार करावा तसेच उच्च स्तरीय समितीने महाविद्यालयांना दंड आकारण्यासाठी मापदंड ठरविण्यात यावे. तसेच ॲमनेस्टी स्कीमबाबत विचार करण्यात यावा. श्री. दिपककुमार मुकादम यांनी ॲमनेस्टी स्कीमबाबत त्यांचा आक्षेप नोंदवला | संलग्नता विभाग |
| ५. | व्यवस्थापन परीषदेचे दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ च्या स्थगित सभेत बाब क्र. ३९ अन्वये श्री. अशोक डांगे यांच्या प्रकरणामध्ये गठीत केलेल्या समितीला कळविण्यात यावे की श्री दिपककुमार मुकादम व्यवस्थापन परीषदेचे सदस्य यांनी विद्यापीठाच्या फंडातील एकही पैसा शासनास देण्यात येऊ नये, असे मत व्यक्त केले आहे. | आस्थापना विभाग २ व ४ |

SKS

| | | |
|---|---|---|
| ६. | मुंबई विद्यापीठाचे व्हिजन व मिशन (मराठी) व्यवस्थापन परीषदेस माहितीकरता सादर करण्यात यावा. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ७. | प्रा. सतिश नारिंगेकर यांच्या नियुक्तीबाबत मान्यता देण्यास उशीर का झाला याबाबत संबंधित विभागाकडून खुलासा मागवण्यात यावा. | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (वि.शि.) |
| ८. | कोणत्याही व्यक्तीची व्यक्तीपरत्वे प्रकरण व्यवस्थापन परीषदेत न आणता धोरण ठरवण्याच्या बाबी व्यवस्थापन परीषदेत आणण्यात याव्यात असे ठरले. | आस्थापना विभाग १ व ३ |
| ~~९.~~ | [illegible] | [illegible] |
| ~~१०~~ ९ | इंन्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड गुड गव्हर्नस (IDECG) या राज्य निवडणूक आयोगाच्या संस्थेचे मुंबई विद्यापीठाचे संस्थापक सदस्य होण्यासाठी मुंबई विद्यापीठाने ५ लाख रुपये दिले व डॉ.मृदुल निळे यांची लायझन अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.त्यांच्याकडुन सर्व सविस्तर माहिति घेऊन देण्यात यावी.<br>१. सदर बाबत आयोगाने मा. राज्यपालांची अनुमती घेतली आहे का?<br>२. सुशासन व लोकशाही ही जबाबदारी संबंधित निवडणुक आयोगाची आहे विद्यापीठाची नाही. राज्य निवडणुक आयोगामार्फत निवडणुक घेण्यासाठी सुधारीत उपाययोजना करणे विद्यापीठाचे कामकाज नाही याची सविस्तर माहिती देण्यात यावी. | राष्ट्रीय सेवा योजना |
| ~~११~~. १० | व्यवस्थापन परीषदेच्या दिनांक ४ जुलै, २०१९ रोजीच्या बैठकीतील ठरावाच्या बाब क्र. ७ अन्वये पारीत झालेल्या श्री. रामराव आदीक एज्युकेशन सोसायटीचे डॉ डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर यांचे समायोजन डॉ डी.वाय. पाटील अभिमत विद्यापीठ मध्ये करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिल्या प्रकरणी कार्यवाही अहवालात जोडलेल्या 'नो डयूज सर्टीफिकेट' बाबत श्री. दिपककुमार मुकादम यांनी आक्षेप नोंदविला. | संलग्नता विभाग |
| ~~१२~~. ११ | व्यवस्थापन परीषदेच्या दिनांक ४ जुलै, २०१९ रोजीच्या बैठकीतील ठरावाच्या बाब क्र.२३ "विश्व विद्यालय अनुदान आयोग कायदा १९५६ कलम १२(बी)" अंतर्गत ज्या महाविद्यालयांना बी.व्होक. व एम.व्होक. अभ्यासक्रमांना मान्यता मिळालेली आहे त्या महाविद्यालयांना, संलग्नता शुल्क देय असल्याची पत्र पाठविण्यात आली किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी. | संलग्नता विभाग |

कुलसचिवांनी उपस्थित सर्वांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

सहायक कुलसचिव

कुलसचिव

प्र—कुलगुरू

इतिवृत्त मंजुर

कुलगुरू